

**आपण बांधत आहोत ते प्रत्येक घर आपल्यालाच इथे राहायला यायचं आहे अशा आत्मियतेने बांधणं, त्यासाठी प्रत्येक वेळी अधिक चांगल्या सोयीसुविधा देणं, नवीन नवीन कल्पना राबवणं आणि एवढं करून घर वेळेत पूर्ण करून घरमालकाच्या ताब्यात देणं म्हणजे तारेवरची कसरत! ही कसरत हसतमुखाने करून दाखवणारे वाई येथील सावली कन्स्ट्रक्शन्सचे श्री. सुरेंद्र वासुदेव ताटके कंपनीच्या नावाप्रमाणेच घरमालकाच्या माथ्यावरची सावली बनून राहिले आहेत.**

# माथ्यावरची सावली


श्री. सुरेंद्र ताटके
मो : ९९२२४ ३९०३९
मुलाखत : जयश्री धुपकर
९८५०६ ६०७८२


गेल्या महिन्यात मी आणि पूर्वा जेव्हा महाबळेश्वरला हॉटेल विशेषांकासाठी मुलाखती घ्यायला गेलो होतो, तेव्हा येताना वाईला श्री. सुरेंद्र ताटके यांच्याकडे मुक्काम केला होता. आमची प्रथम भेट होती होती, परंतु श्री. सुरेंद्र उर्फ दादा ताटके यांनी इतक्या आपलेपणाने आमचे स्वागत केले, की तासाभरातच आम्ही त्यांच्या घरच्या होऊन गेलो.



वाईमधला बहुतेक प्रत्येकजण दादांना ओळखत असावा. कारण वाईमध्ये त्यांनी इतकी बांधकामं केली आहेत, की प्रत्येकाच्या ओळखीचा कुणी ना कुणी दादांनी बांधलेल्या घरात राहात आहे.

दादा स्वत:बद्दल बोलायला तयार नव्हते, पण त्यांचे पुत्र श्री. सौरभ ह्यांना दादांबद्दल इतकं अप्रुप आहे, की त्यांनी दादांना मुलाखतीला तयार केलं. ह्या शांत वृत्तीच्या साध्यासुध्या माणसाने केवढं प्रचंड काम केलंय ते त्यांनी सांगितल्याशिवाय कळणार नाही.

दादांचे आजोबा वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण. वडिलांचा मात्र व्यवसाय. आई गृहिणी. मग दादा या व्यवसायात आले कसे? वाचूया त्यांच्यात शब्दात....

वाईमधल्या शालेय शिक्षणानंतर कऱ्हाडला सिव्हील इंजिनीअरिंगमधला डिप्लोमा पूर्ण केला. लगेचच राज्यशासनाच्या इरिगेशन खात्यात ज्युनिअर इंजिनीअर म्हणून नोकरी लागली. १९७० ते १९८० अशी तब्बल दहा वर्षे सातारा, सांगली, ठाणे अशा ठिकाणी नोकरी केली.

**नोकरीत मन रमत नव्हते असंही म्हणालात ना?**

हो ना! सरकारी कारभार कसा असतो तुम्हाला सांगायला नको. आजूबाजूला प्रत्येक टेबलाखालून चाललेल्या व्यवहाराने माझा जीव उबून गेला. त्यात आणखी महाडला बदली झाली. हे कारण दाखवून मी लगेच राजीनामा खरडला आणि वाईला परत गेलो.

**वाईला स्वत:चा व्यवसाय सुरू केला का?**

छे छे! मी इतका धाडसी वगैरे नव्हतोच. खरं म्हणजे मला इमारती बांधकामाची आवड होती. मी इरिगेशन खात्यात नोकरीला लागल्याने आणि तेही ऑफिसमध्ये - मला इमारतींचा अनुभव तर मिळाला नाहीच; पण प्रत्यक्ष बांधकामावर जायची संधी पण मिळाली नव्हती. नोकरी सोडून आल्यामुळे मी १९८१ साली वडिलांच्या स्टेशनरीच्या दुकानात लक्ष घालायचं ठरवलं. पण तिथेही मन रमेना.

योगायोगाने डोंबिवलीच्या कै. दादा जोगळेकर आणि श्री. विलास साने यांनी महाबळेश्वरच्या त्यांच्या हॉटेल 'साज' चे बांधकाम करण्यासाठी नोकरी देऊ केली. आर्किटेक्ट श्री. अशोक पुंगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली साज हॉटेल आणि परिसरातील काही बंगले बांधून पूर्ण केले. शिवाय हॉटेल पूर्ण झाल्यावर तिथे २ वर्ष मॅनेजरची नोकरीही केली. आता मला थोडा आत्मविश्वासही जाणवायला लागला होता. त्यामुळे मी

महाबळेश्वरची नोकरी सोडून पुन्हा एकदा वाईला परत आलो.

**वाईला परत काय? नोकरी की व्यवसाय?**

साज हॉटेल बांधताना मी खूप अभ्यास केला म्हणा, किंवा एकहातीच सर्व काम केलं होतं म्हणून म्हणा - धाडस केलं आणि सुपरव्हिजन चार्जेस घेऊन कामं घ्यायला सुरुवात केली. ५-६ वर्षे असं केल्यावर थोडं भांडवल घालून मटेरियलसह कामं स्वीकारायला सुरुवात केली.



**तुमचे पहिले ग्राहक कोण होते?**

वाईमधील प्राध्यापक सोसायटीमध्ये ३ बंगल्यांचं काम होतं. सुरुवात ३ बंगल्यांनी झाली, पण ६ महिन्यात १४ बंगल्यांची कामं मिळाली.

**तुमची कामं कुठल्या प्रकारची असतात?**

मी सर्व प्रकारची बांधकामं केली. फॅक्टरी, हॉस्पिटल, कमर्शियल कॉम्प्लेक्स, लॉज, फार्म हाऊस, हॉटेल, सभागृह इत्यादी सर्व बांधलंच. पण माझी खरी आवड बंगल्यांची आहे. मी जवळजवळ १५०-२०० बंगल्यांची बांधकामं केली.

आज जवळजवळ २५ वर्षे दादा ताटके बांधकाम व्यवसायात आहेत. प्रत्येक ग्राहक हा ग्राहक न राहता दादांचा जवळचा मित्रच झाला आहे. २०-२५ वर्षपूर्वीचे त्यांचे ग्राहक आजही त्यांचे मित्र आहेत. दादांची कामं पाहून प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक कै. व्ही. एम जोग, कै. बी. जी. शिर्के ह्यांनी त्यांचे जाहीर कौतुकही केले आहे.

**तुम्ही एवढी कामं केलीत, त्यात तुमचे सगळ्यात आवडते काम कुठले?**

प्रत्येकजण साधारणपणे आयुष्यात एकदाच घर बांधतो. त्यासाठी घेतलेले कर्ज पुढची १५-२० वर्षे फेडत असतो. त्याचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी मी माझी समजतो.

ह्या सर्व कामांमध्ये डॉ. जयंत नारळीकर ह्यांचे कोल्हापूरचे काम माझ्या कायम लक्षात राहील ते डॉक्टरांनी माझ्यावर टाकलेल्या विश्वासामुळे! जुना वाडा बघून येणे, त्यासाठी आर्किटेक्ट शोधणे, नव्या इमारतीचे प्लॅन पास करून घेणे, बिल्डर बघणे, इमारत बांधणे, अगदी त्यांच्या वास्तुशांतीपर्यंत सर्व तयारी करणे ही माझ्यावर जबाबदारी टाकली होती.

तुमच्या भाषेत, 'टर्नकी प्रोजेक्ट' म्हटलं तरी चालेल. जे काम दहा वर्षे रखडलं होतं, ते दीड वर्षात मार्गी लागलं. त्यामुळे डॉ. जयंत नारळीकर यांचा मला जो स्नेह मिळाला आणि मिळत आहे त्याला तोड नाही.

आणखी एक आनंदाचा क्षण म्हणजे, दिल्लीच्या एका नामांकित कंपनीने देशभरातील उत्कृष्ट बंगल्याच्या प्लॅनिंगसाठी २००२ साली स्पर्धा घेतली होती. त्यात पुण्याचे सुप्रसिद्ध आर्किटेक्ट श्री. रवी गद्रे यांनी प्लॅनिंग केलेल्या वाईच्या डॉ. मुजुमदारांच्या बंगल्याचा पहिला नंबर लागला तो बंगला मीच बांधला होता. त्यामुळे देशभरातल्या अनेक नियतकालिकांमधून श्री. गद्रे आणि माझे नाव प्रसिद्ध झाले.

> एका अत्यंत प्रामाणिक बिल्डरची हकिकत सांगावी तर ती 'फॅण्टसी' ठरेल, पण मी स्वत: या फॅण्टसीचा एक साक्षीदार आहे. बिल्डरच्या प्रामाणिकपणामुळे मस्तक झुकवावं की संपूर्ण कामाची जबाबदारी बिल्डरवर सोपवून निवांत राहणाऱ्या मालकाला प्रणाम करावा हे कोडं मला सुटलं नाही. बिल्डरचं नाव 'सुरेंद्र ताटके.' सरकारी नोकरी आणि मुंबईतलं वास्तव्य सोडून आमचा हा ताटके त्यांच्या जन्मगावी म्हणजे वाईला गेला आणि तेथे त्याने बिल्डरचा व्यवसाय सुरू केला. छोटी-मोठी कामं स्वीकारीत गेल्या दहा वर्षात वाईसारख्या ठिकाणी पन्नासहून जास्त कामं पूर्ण केली. एक-एक काम बघत राहावं असं! प्रत्येक वास्तू देखणी. चोरांच्या दुनियेत तो चोरांशीच स्पर्धा करीत राहिला असता, तर इतका नावारूपाला आला नसता. प्रामाणिक जगतात स्पर्धाच कमी असल्यामुळे तिथे यश मिळायला वेळ लागला नाही.
>
> व. पु. काळे
>
> 'माणसं' (पान नं. ११२)

ही सगळ्यात चांगली कामं दादांनी सांगितल्यावर मी त्यांना, एखादा कटू अनुभव सांगा म्हणून म्हटलं. त्यावर दादांची प्रतिक्रिया होती, की 'झालं गेलं गंगेला मिळालं.' पण माझी अशी इच्छा होती, की व्यवसाय सुरू केल्यावर आपल्याला ग्राहक कसं फसवतात आणि काय काळजी घ्यावी तेही नव्याने येणाऱ्या युवकांना कळलं पाहिजे.

परंतु अशा अनुभवाबद्दल दादा बोलायलाच तयार नव्हते. चांगले अनुभव बरेच आल्याचे त्यांनी सांगितले. २००५ मध्ये त्यांच्या मुलीचे सौ. शुभांगीचे लग्न होते. त्याच वेळेस श्री. बाळासाहेब नायकवडी यांच्या बंगल्याचे काम सुरू करायचे होते. परंतु मुलीचे लग्न आहे म्हणून सुपरव्हिजन चार्जेसपैकी मोठा हिस्सा श्री. नायकवडींनी आधीच दादांच्या

प्रिय विभास,

मी तुम्हाला ताटके ह्यांच्यासारखा स्नेही देत आहे. तुमच्या हाकेसरशी ते धाव घेतील. फक्त ह्याच कामासाठी नव्हे, तर खरोखरच तुमच्या भावी कारकिर्दीसाठी एक मार्गदर्शक देत आहे. ते हुकूम करणारे नाहीत, हितगुज करणारे आहेत. धारेवर धरणारे नाहीत, व्यक्तिमत्त्वाला धार आणि आधार देणारे आहेत.

**व. पु. काळे**

सुपुर्द केला. अशा अनेक आठवणी दादांजवळ आहेत.

बांधकाम हा जरी दादांचा श्वास असला तरी 'साहित्य' हाही दादांचा प्राण आहे. कामाच्या निमित्ताने अनेक थोरामोठ्यांच्या झालेल्या ओळखी ही दादांची संपत्ती आहे. कै. व. पू. काळे यांचा स्नेह ही अशीच दादांनी जमवलेली 'माया' आहे. वपूंच्या कथाकथनाच्या ५०-६० कार्यक्रमांना त्यांच्याबरोबर राहण्याचं भाग्य दादांना मिळालेलं आहे. ह्या दरम्यान वपूंनी दादांचं काम, दादांचा स्वभाव पाहिला आणि आपल्या 'माणसं' या पुस्तकात दादांवर एक लेखच लिहिला आहे. तो संपूर्ण वाचण्यासारखाच आहे. त्यातील थोडा भाग मी चौकटीत दिलाच आहे.

त्याचप्रमाणे एका कॉन्ट्रॅक्टरने काम चांगलं केलं नाही, म्हणून त्याला दादांचा सल्लाही वपूंनी घ्यायला सांगितला आहे. त्यातील काही भागही नवीन मुलांनी लक्षात घेण्यासारखा आहे.

मी दादांना त्यांच्या यशाबद्दल विचारल्यावर दादा सांगतात.... प्लॅनप्रमाणे काम, उत्तम रॉ मटेरियल आणि वर्कमनशिप या तीन गोष्टी असतील, तर काम उत्तमच होणार. माझ्याकडे काम करणारे जवळजवळ ८०% कामगार हे सुमारे २० वर्षांपासून माझ्याकडे आहेत. त्यांना माझी कामाची पद्धत माहीत आहे. त्यामुळे माझंही काम उत्तम आणि वेळेत होतं.

प्रत्येकजण साधारणपणे आयुष्यात एकदाच घर बांधतो. त्यासाठी घेतलेले कर्ज पुढची १५-२० वर्षे फेडत असतो. त्याचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी मी माझी समजतो.

**२५ वर्षांपूर्वीच्या कामात आणि सध्याच्या कामात तुम्हाला फरक काय दिसून येतो?**

आता साहित्य, तंत्रज्ञान यात खूपच बदल झालाय. आम्ही बी. जी. शिर्के कंपनीच्या सिपोरेक्स विटा आणि ग्रीन बिल्ड कंपनीची पेस्ट वापरतो, त्यामुळे पाण्याची बचत होते, ओल राहात नाही, सिमेंट, वाळू लागत नाही. त्यामुळे साईटही स्वच्छ राहते.

**तुमच्या कुटुंबियांचा तुमच्या कामात पाठिंबा कशा प्रकारे असतो?**

माझी पत्नी सौ. गीता माझ्या व्यवसायातील मोठा आधारस्तंभ आहे. अगदी छोट्या बचतीमधून मोठी बचत होते यावर तिचा विश्वास आहे. माझ्या मिळकतीचे नियोजन ती स्वत: करते. माझी मुलगी सौ. शुभांगी निलेश ब्रह्मे पुण्याला असते. माझा मुलगा सौरभ आता इंजिनीअर होऊन माझ्या व्यवसायात पूर्ण वेळ असतो. माझी सून सौ. प्राची (काटदरे) इंटिरियर डिझायनर असून तीही आमच्याबरोबर काम करते.

वाईमध्ये दादांनी नुकताच स्वत:चा खास वेगळा बंगला बांधलाय. त्यातलं वेगळेपण पण मला जाणवलं म्हणजे, घरात नैसर्गिक उजेड भरपूर येईल अशी व्यवस्था केलीय. दुसरं वैशिष्ट्य जाणवलेलं म्हणजे, सौरभच्या बेडरूमचा दरवाजा पांढऱ्या शुभ्र लॅमिनेटचा आहे. जे मोठमोठे दिग्गज कलावंत दादांच्या घरी येऊन जेवून गेले, त्यांच्या - श्रीकांत मोघे, सुधीर मोघे, इला भाटे, शौनक अभिषेकी, मंगेश तेंडुलकर इत्यादींच्या सह्या सौरभने त्याच्या दारावरच घेऊन ठेवल्या आहेत.

**तुमच्या पुढच्या योजना काय आहेत?**

जशी बी. जी. शिर्के, ग्रीनबिल्ड प्रॉडक्ट्स यांची एजन्सी घेतलीय, तशाच पण पर्यावरणप्रेमी उत्पादनांची एजन्सी आम्ही घेऊ. सौरभ माझ्या जोडीला असल्याने आम्ही कामंही अधिक घेऊ शकतो. माझे मित्र पुण्याचे आर्किटेक्ट श्री. रवी गद्रे यांच्याबरोबर मी जवळजवळ ८० बंगले केले आहेत.

**श्री. सुरेंद्र उर्फ दादा ताटके यांना बांधकाम व्यवसाय करण्यासाठी परमेश्वरानेच उर्मी दिली असा सार्थ विश्वास त्यांना वाटतो. दादांनी बांधलेल्या प्रत्येक घरात घरमालक आनंदाने आणि समाधानाने राहात आहे. हे यश म्हणजेच परमेश्वराची कृपा आहे असे ते म्हणतात. अशीच कृपा त्यांच्यावर कायम राहो आणि त्यांच्या 'सावली कन्स्ट्रक्शन्स' ची सावली अनेकजणांना लाभो अशीच परमेश्वरापाशी आमची प्रार्थना!**

*****


नितीन सुपनेकर — दूरध्वनी
मोबा. : ९४२२४ ९६४६९ — २८३०१३, २८१११३

सुपनेकर
भोजन-निवास प्रबंध
सुपनेकर अल्पोपहार

'सीता-राम', ३०२ यादोगोपाळ पेठ, सातारा - ४१५ ००२